# परीक्षेला विराम

## योग्यच, पण...

**मंजिरी निंबकर**

फलटण (जि. सातारा)
भ्र. ९८२२ ०४० ५८६
ईमेल : manjunimbkar@gmail.com

सहावीच्या वर्गातील मुले गटागटाने प्रार्थना हॉलमध्ये बसली होती. एक गट पुढे येऊन नाटक करून दाखवीत होता. नाटक झाल्यावर सर्वांनी चर्चा केली. 'हलवाई की ॲक्टिंग तो बढिया थी।', 'ऐसा लग रहा था कि वो सचमुच जलेबी बना रहा था।', 'हाँ! वो गाना भी गुनगुना रहा था।', 'मगर लड्डू तो किताब का ही डायलॉग बोल रहा था।', 'बाई, लड्डू का कॅरॅक्टर मोटा, गोलमटोल होना चाहिए था। है नं? वो तो भी एक दुबली-पतली लडकी।', 'अफसर बीच-बीच में डायलॉग्ज भूल रहा था।', 'बाई, हमें बहोत मजा आया।' चर्चेनंतर सर्वानुमते गटाच्या सादरीकरणाला 'ब' शेरा बहाल केला गेला. पण गटाला मात्र 'अ' शेरा हवा होता. मग सुचवल्या गेलेल्या विविध दुरुस्त्या करून उद्या आम्ही परत सादर करतो म्हणून गट खाली येऊन बसला व दुसरा पुढे गेला.

ही परीक्षा चालली होती असे म्हटले तर अनेकांना खरेच वाटणार नाही. पण बाईंनी आपल्या निरीक्षणांमधून व पिअर इव्हॅल्युएशन (सहकाऱ्याचे मूल्यमापन) या पद्धतीतून गटात काम करण्याचे व एकमेकांचे ऐकून घेण्याचे कौशल्य, धडा अभ्यासून त्याचे स्क्रिप्टमध्ये रूपांतर करण्याचे कौशल्य, हिंदीतून संवाद लिहिण्याचे कौशल्य, सादरीकरणाचे कौशल्य, चर्चा करून एकमेकांच्या कामाचे मूल्यमापन करण्याचे कौशल्य इत्यादी मुलांच्या अंगी किती प्रमाणात विकसित झाली आहेत हे पाहिले होते. गटाचा शेरा तो मुलांचा वैयक्तिक होता.

गुणांच्या बाजारात कदाचित कुठलेच कौशल्य महत्त्वाचे ठरणार नाही. परंतु सातत्यपूर्ण, सर्वंकष मूल्यमापनाने या कौशल्यांना मुलांच्या विकासात स्थान दिले आहे. १९९९ च्या प्रोब रिपोर्टमधील पालकांच्या अपेक्षा पाहिल्या तर त्यात गुणांना फारसे स्थान नाही असे दिसते. शाळाप्रणालीकडून पालकांना काय हवे आहे, तर मुलांनी चांगल्या व्यक्ती बनावे, चांगले बोलायला, वागायला शिकावे, हुशार व्हावे, स्वतःची आणि स्वतःच्या परिसराची काळजी घ्यावी. लिहायला-वाचायला शिकावे आणि जास्त शिकली तर चांगली नोकरी मिळावी. बस्स! पण गेल्या अकरा वर्षांत

काही दबाव गटांमुळे शाळा=गुण हेच समीकरण पालकांच्या डोक्यात घट्ट बसले आहे. परंतु गुण=परीक्षा आणि परीक्षा=ताण ही दोन नवी समीकरणे तयार झाली आणि शाळा=ताण येथे ते येऊन थांबले. आधीच शाळेत जे काही मिळते त्याचा आपल्या रोजच्या जगण्याशी काही फारसा संबंध नाही असे बहुसंख्य मुलांना वाटते. त्यात शाळा=ताणची भर पडल्यावर तर मुले शाळाबाह्य व्हायला चांगलेच कारण मिळते.

मूल कसे शिकते याचा विचार केला तर काय आढळते? अगदी लहान म्हणजे ० ते ५ वर्षे वयोगटातील मूल परिसरातील विविध प्रेरकांना प्रतिक्रिया देत शिकत असते. ते फक्त आकर्षक आणि वेधक वाटणाऱ्या गोष्टींकडे व घटकांकडेच लक्ष देते. त्या गोष्टीकडे पाहून, ती हाताळून, तिच्याशी खेळून, ती तोंडात घालून समजून घेते. त्या गोष्टीची मुलाच्या मनात एक समज निर्माण होते तेव्हा त्याचे शिकणे झालेले असते. त्याची परीक्षा घेण्याची गरज नसते. मात्र औपचारिक शिक्षणात नीरस वाटणाऱ्या गोष्टींकडेही मुलांना लक्ष द्यावे लागते. आपल्या आजच्या शिक्षणव्यवस्थेत 'सांगितलेले करणे' याला सर्वाधिक महत्त्व आहे. शिक्षकांनी सांगितलेले मुलांनी करणे. समजले, पटले नाही तरी करणे. समजून घेण्यासाठी प्रश्न विचारला तर मूल आगाऊ, उद्धट. अशा परिस्थितीत 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५'मध्ये अपेक्षित असणारा ज्ञान-रचनावाद प्रत्यक्षात उतरणार कसा? मुले जेव्हा स्वतःहून निरीक्षण करतात, प्रश्न विचारतात, विचार करतात, अनुमान बांधतात, थोडक्यात स्वप्रयत्नाने शिकतात तेव्हा प्रस्थापित शिक्षणव्यवस्थेला धक्का बसतो. 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५' सांगतो की, मुलांना स्वतःच्या शिकण्याचे स्वामित्व घेऊ द्या, तरच शिकणे ही प्रक्रिया विद्यार्थीकेंद्रित होईल. पुढील उदाहरणावरून हे स्पष्ट होईल.

इयत्ता पाचवीच्या वर्गात विज्ञानात पचनसंस्थेबद्दल धडा चालला होता. कबुतराची पचनसंस्था कशी असते, हत्तीचे आतडे किती मोठे असते, अळीच्या पोटात काय असते, असे अनेक प्रश्न मुलांना पडले. त्यातून पाचवीच्या वर्गात एका प्रकल्पाचा जन्म झाला. ज्यांना त्याच एका प्राण्याबद्दल उत्सुकता आहे, त्या त्या मुलांनी आपला एक गट बनवला आणि वाचनालयात जाऊन माहिती शोधायला सुरुवात केली. पहिले काही दिवस कुणालाच काही सापडेना. मात्र एकदा संदर्भ शोधण्याची कळ सापडली की काम झपाट्याने सुरू झाले. शिक्षिकेचे काम होते ज्ञानाच्या प्रवासाचे निरीक्षण करण्याचे आणि मागितला तर मागे पडणाऱ्यांना एक मदतीचा हात देण्याचे. काही मुलांना हवी

**सध्याच्या परीक्षापद्धतीत चूक-बरोबर, पास-नापास, प्रगत-अप्रगत असे शेरे देऊन मुलांचे शिक्षण करण्याऐवजी चाळणी लावण्याचेच काम केले जाते. ही मुले हुशार, यांना पुढे शिकू दे. ही मुले 'ढ', यांना कामगार बनू दे - समाजातील असमानतेवर शिक्कामोर्तब करणारी अशीच ही आजची शिक्षणप्रणाली आहे. मुलांना अप्रगत असा शिक्का मारून शाळेबाहेर काढणाऱ्या परीक्षांना पर्याय हवाच.**

असलेली माहिती फक्त इंग्रजी पुस्तकांमध्ये मिळाली. मग त्यांनी नववी-दहावीतील ताई, दादा, सर, बाई यांना पकडून माहिती समजून घेतली. आपल्याला मिळालेल्या माहितीचे तक्ते बनवले. आकृत्या काढल्या आणि वर्गात सादरही केली. पुस्तकातील पचनसंस्था या धड्यावर परीक्षेत प्रश्न विचारण्याऐवजी बाईंनी प्रकल्पाच्या आधारे मुलांचे मूल्यमापन केले. मूल्यमापनाचे निकष होते संदर्भ शोधण्याचे कौशल्य, माहितीच्या फापटपसाऱ्यातून योग्य ती माहिती गाळून घेण्याचे कौशल्य, न समजलेला भाग इतरांकडून समजावून घेण्याचे कौशल्य आणि माहितीची मांडणी व सादरीकरण करण्याचे कौशल्य. या उदाहरणात आपल्याला काय शिकावेसे वाटते हे ठरविण्याचा हक्क विद्यार्थ्यांधीन होता आणि मूल्यमापन केले होते त्यांच्या शिकण्याच्या प्रवासाचे. इथे परीक्षेची गरज नव्हती.

परीक्षा नसतील तर मुले शिकणार कशी, हा प्रश्न बहुसंख्य शिक्षक आणि पालक विचारतात. हे जर खरे असते तर चार-पाच वर्षांपूर्वी महाराष्ट्रात जेव्हा मुले वर्षभरात डझनभर परीक्षांना सामोरी जात होती तेव्हाच महाराष्ट्रात १००% मुले साक्षर व्हायला हवी होती. तसे तर काही झाले नाही. मग परीक्षा कशाला? तर मुलांच्या चुका दुरुस्त करायला. पण चुका होतात केव्हा? दिलेले जसेच्या तसे उतरवले नाही तर. खऱ्या आयुष्यातील कोणत्याही प्रश्नाला मात्र एकापेक्षा अनेक बरोबर उत्तरे असू शकतात. इयत्ता दुसरीच्या बाईंनी वर्गात एक दिवस दुकान मांडले होते. दुकानात दहा दिवस मुले तयारी करीत होती. साबणाचे रॅपर्स, टूथपेस्टचे डबे, मोकळ्या रंगपेट्या असे कितीतरी सामान त्यांनी आणले. त्यावर बाईंनी किमतीच्या चिठ्ठ्या लावल्या.

काही मुले दुकानदार झाली, तर काही गिऱ्हाईक. प्रत्येक विद्यार्थ्याला वीस रुपये दिले. आपल्याला काय काय सामान हवे आहे याची प्रत्येक गिऱ्हाइके यादी करायची. वीस रुपयांत ते बसेल का याचा अंदाज घ्यायचा आणि जाऊन प्रत्यक्ष खरेदी करायची. मग दुकानदाराने हिशोब करून बिल सांगायचे. पैशाची देवाणघेवाण करायची. शिक्षकांनी फक्त निरीक्षण करून नोंदी ठेवायच्या. बेरीज, वजाबाकी, तोंडी हिशेब करणे, अंदाज बांधणे, आपल्याला काय काय वस्तू हव्या आहेत हे ठरवणे इत्यादी गणिती कौशल्यांचे मूल्यमापन खेळता-खेळता ताणरहीत पद्धतीने झाले. या परीक्षेत कुणाला 'चूक' म्हणण्याचा प्रश्नच आला नाही. कारण आपल्याला हव्या त्या वस्तू वीस रुपयांत बसत नाहीत हे मुलांच्या लक्षात आले की ती आपल्या आपणच दुरुस्ती करीत होती. देणारी आणि घेणारी मुले तोंडी हिशोब तपासत होती.

सातत्यपूर्ण, सर्वंकष मूल्यमापनाने चाचण्या घ्यायला सांगितले. परंतु ते तणावरहीत वातावरणात व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. चौथीच्या वर्गात एक दिवस बाईंनी वर्गात आल्या-आल्या सांगितले की मी आज मराठीची चाचणी घेणार आहे. मुलांनी कालवा केला, ''बाई, लिहिण्याची नको.'' बाई म्हणाल्या, ''चाचणी तर लिहिण्याचीच आहे. पण आपण जरा गंमत करू. मी दिलेल्या परिच्छेदातील एक एक शब्द सुटा करून विरामचिन्हे वापरून परिच्छेद पुन्हा लिहा.'' मग बाईंनी 'लिहा नेटके' या पुस्तकातील एक परिच्छेद दिला. 'मराठीवाचनासहेताभिलाषेसरांनीमुलांनाप्रश्नविचारलाकैलाचवालवगाडीओढूस...' मुलांना चाचणी लिहिण्यात मोठी गंमत आली हे वेगळे सांगायला नको.

सध्याच्या परीक्षापद्धतीत चूक-बरोबर, पास-नापास, प्रगत-अप्रगत असे शेरे देऊन मुलांचे शिक्षण करण्याऐवजी चाळणी लावण्याचेच काम केले जाते. ही मुले हुशार, यांना पुढे शिकू दे. ही मुले 'ढ', यांना कामगार बनू दे - समाजातील असमानतेवर शिक्कामोर्तब करणारी अशीच ही आजची शिक्षणप्रणाली आहे. मुलांना अप्रगत असा शिक्का मारून शाळेबाहेर काढणाऱ्या परीक्षांना पर्याय हवाच.

आजच्या परीक्षापद्धतीतून यशस्वी असा शिक्का मारून बाहेर पडलेली मुले खरोखरच यशस्वी असतात का? एक व्यक्ती म्हणून समाजात जगण्यासाठी आवश्यक असणारी किती कौशल्ये त्यांना अवगत असतात? या प्रश्नांची उत्तरे नकारात्मक असतील तर बदल गरजेचे आहे. CCE ही निव्वळ परीक्षापद्धती नसून, शिक्षण म्हणजे काय असावे हे सांगण्याचा एक प्रयत्न आहे.

आजच्या शिक्षणप्रणालीत काय शिकायचे, कसे शिकायचे, काय विचारायचे, काय बरोबर, काय चूक, हे ठरविण्याचे सर्व हक्क शिक्षकांनी स्वतःकडे राखून ठेवले आहेत. तेच जर मुलांकडे दिले तर शिकणे व मूल्यमापनाची प्रक्रिया आनंददायीच होऊन जाईल. हे उदाहरण पाहा. इयत्ता सातवीच्या वर्गात हिंदीच्या शिक्षिकेने मुलांना 'चकमक' या विज्ञानपत्रिकेचे काही अंक दिले. त्यातून आपल्याला सर्वात आवडलेली एक कथा आपल्या शब्दांत लिहून त्यावर प्रश्न विचारायचे असे सांगितले. एका मुलाने गोष्ट निवडली 'नटखट चुन्नी.' या चुन्नी नावाच्या एका मुलीला तिची आजी फळे आणायला दहा रुपये देते. चुन्नी फळे आणते व आजीला विचारते, आप बाहर का खाओगे या अंदर का? आजी म्हणते, मैं अंदर का मऊ मऊ खाऊंगी! चुन्नीने बोरे आणली होती. तिने बोरे खाल्ली व बिया आजीला दिल्या. नंतर पुन्हा विचारले, आज बाहर का खाओगे या अंदर का? आधीच्या अनुभवावरून आजी म्हणाली, बाहर का. यावेळी चुन्नीने आणलेला असतो नारळ. ती खोबरे खाते व आजीला करवंटी देते. विद्यार्थ्यांनी विचारलेले प्रश्न होते - 'बच्चे नटखट क्यों होते है?', 'नारळाच्या करवंटीचे काय काय करता येते?', 'बोराची बी खाता येते का?' सध्याच्या पुस्तकात जर ही गोष्ट असती तर त्यावरचे प्रश्न काय असते याचा हे शिक्षणात काम करणाऱ्या कुणालाही अंदाज येईलच. या अध्ययनप्रक्रियेतून वर्गातील सर्वच मुले हिंदी वाचायला, समजून घ्यायला, लिहायला व प्रश्न विचारायला शिकली. भाषाशिक्षण याहून वेगळे काय आहे?

दुर्दैवाने सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन अजूनही गुणांवर आधारित आहे. शिक्षककेंद्रित आहे आणि ज्ञानरचनावादी अध्ययनानुभवांपासून कित्येक मैल दूर आहे. पण एकदा बदलाची प्रक्रिया सुरू झाली की हळूहळू योग्य दिशेने बदल होत राहतील अशी आशा करायला हरकत नाही. ■


'चकमक' मुंबईत

शब्द द बुक गॅलरी
शॉप २, क्रेस्ट अपार्टमेंट, वझिरा नाका,
बोरिवली (प.), मुंबई ४०० ०९१
दू. २८३३ २६ ४०, ९८२०१४७२८४